# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
# अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग,सांगली
# जाहीर निवीदा सुचना क्रं. – 02/2020-21

---

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका अग्निशमन व आणीबाणी सेवा (प्रादेशिक आपत्ती व्यवस्थापन केंद्र)विभाग खाली नमुद केलेल्या कामासाठी मनपाच्या www.smkc.gov.in या वेबसाईटव्दारे ऑनलाईन निवीदा मागविणेत येत आहे.

| S.No. | Description | Qty. | Sub Total (INR) |
|---|---|---|---|
| 1. | 100 W Panel | | |
| 2. | Combined Charger (MSEB+Solar) | | |
| 3 | Call Recorder Special | | |
| 4. | Battery 165 AH | | |
| 5. | Amplifire 80 W. | 2 | |
| 6. | Karna unit 40 w – 4 Nos | | |
| 7. | Wireless Equipments | | |
| 8. | HARDWARE | | |
| 9. | Speaker UNIT | | |
| 10. | Movable ACP BOX (BOX SPECIPICATION 2.′ X 2.5′ X 6′) | | |
| 11. | MIC | | |

1.बयाणा रक्कम अंदाजे रक्कमेच्या 1 टक्का व सुरक्षा अनामत मंजुर दराच्या 5 टक्के राहील.
2.वरील कामासाठी निवीदा फॉर्म मिळण्याचे व सादर करणेचे ठिकाणी www.smkc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध राहील.
3.संपूर्ण निवीदा प्रक्रिया अर्ज विक्री सादरीकरण व स्विकृती www.smkc.gov.in या व्दारे कार्यरत राहील.
4.निवीदा संच खरेदी करणे व भरणेची मुदत निवीदा प्रसिध्दीपासून दि. 15/06/20 पर्यंत राहील.
5.निवीदा दिनांक 16/06/20 रोजी दुपारी 04.00 वाजता निवीदा कमिटी समोर उघडणेत येतील.
6.या निवीदा बाबतच्या शती www.smkc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
7.कोणतीही एक निवीदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा मा.आयुक्तसो महानगरपालिका यांचा राहील.

मनपा/अग्नि व आणीबाणी/1/ 87 /2020-21.
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक- 03/06/2020

स्वाक्षरी/-

आयुक्त,
सांगली मिरज कुपवाड शहर
महानगरपालिका.

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका
## शर्ती व अटी

**कामाचे नांव- आपत्ती व्यवस्थापन अभियांना अंतर्गत स्मार्ट ॲंड्रॉईड वायरलेस ब्रॉडकास्टिंगसिस्टीम खरेदी करणेबाबत.**

---

लिफाफा नं.1 मध्ये खालील कागदपत्राच्या प्रती आवश्यक आहेत.त्याशिवाय लिफाफा नं. 2 निविदा फॉर्म उघडला जाणार नाही.

निविदा दोन लिफाफा पध्दतीने कागदपत्रासह भरुन दाखल करण्याचे आहे.

लिफाफा नं. 1 मधून खालील कागदपत्राच्या सत्य प्रती स्वाक्षांकित करुन स्कॅन करण्याच्या आहेत.त्याशिवाय लिफाफा नं. 2 उघडला जाणार नाही.

1. बयाणा रक्कम 1 % खातेवर रक्कम भरल्याचे चलन.
2. जीएसटी आवश्यक लागणारी कागदपत्रे जोडण्याची आहेत.
3. पॅनकार्ड छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
4. पुरविलेल्या कामाचा अनुभवाचे प्रमाणपत्र.

## शर्ती व अटी :-

लिफाफा क्रं. 2 मध्ये दर भरुन ते ऑनलॉईन सादर करण्याचे आहे.

1. बयाणा रक्कम निविदा रकमेच्या 1 % www.smkc.gov.in व्दारे ऑनलाईन भरणेची आहे.
2. बयाणा रक्कम / वॉरंटी पिरीयड 3 वर्षाचा राहील.मुदत संपलेनंतर लेखी अर्जाने सुरक्षा अनामत मागणी करता येईल.मालाचा दर्जा गुणवत्ता दोष / तक्रार निर्माण झाल्यास सुरक्षा अनामत / बयाणा रक्कम परत करण्याचा हक्क महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.
3. निविदा मान्य झाल्यावर योग्य त्या किमतीच्या स्टॅम्प पेपर वर स्वखर्चाने करारनामा सात दिवसात लिहून दिला पाहीजे.अन्यथा पर्यायी व्यवस्था करण्यामध्ये महानगरपालिकेचे नुकसान झाल्यास बयाणा जप्त करणे,काळया यादीत नाव घालणे वसुली करणे ही कारवाई केली जाईल.
4. वरील कामाच्या तपशीलाप्रमाणे पुरविणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.
5. ॲडव्हान्स पेमेंट दिले जाणार नाही.
6. निवीदा दर सर्व टॅक्ससह एलबीटी वाहतुक इत्यादीसह एक्साईज समाविष्ठ करुन दर देण्याचा आहे.
7. वाहतूक ने आण व पोहोच स्वखर्चाने करणेची आहे.डिलीव्हरी अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग मुख्यालय येथे देण्याचे आहे.
8. निवीदा फॉर्मवर मक्तेदाराने कोणत्याही अटी घालण्याच्या नाहीत.
9. सदर कामाची मुदत वर्कऑर्डर मिळाल्यापासून 07 दिवस राहील.मुदतीत काम न झाल्यास पुढील पत्येक दिवसांसाठी रुपये 500/- प्रति दिनी दंडात्मक कारवाई केली जाईल.
10. शर्ती अटीचा भंग केल्याचे दिसून आल्यास करारपत्राचा भंग केला म्हणून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.( काळया यादीत नाव समाविष्ट करणे व नुकसान भरपाई वसुल करणे. )
11. कोणतीही निवीदा मंजुर / नामंजुर अगर सर्व निवीदा कारण न देता नामंजुर करण्याचा अधिकार मा.आयुक्तसो सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

पुढील पानांवर

प्रथम दाखला

12. निवीदा दोन लिफाफा पध्दतीने www.smkc.gov.in या वेबसाईटवार ऑनलाईन निवीदा भरण्याच्या आहेत.
13. ऑनलाईन निवीदा दिनांक / /2020 पर्यत भरणेच्या आहेत निवीदा दिनांक / /2020 रोजी दुपारी 12 वाजता निवीदा समितीसमोर उघडणेत येतील त्यावेळी मक्तेदार उपस्थितीत राहु शकतात.
14. परफॉमन्स सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम खालीलप्रमाणे राहील.
    a) I) निवीदा भरले निवीदा धारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किमतीपेक्षा 10 % पर्यत कमी असेलतर सदर निवीदाधारकाने निवीदाधीन किमतीचे 1 % तसेच
    ii) निवीदा भरले निवीदा धारकाचा दर हा अंदाजपत्रकीय दराच्या किमतीपेक्षा 10 % पेक्षा जास्त दराने कमी असेल तर अंदाजपत्रकीय दराच्या किमतीपेक्षा 10 % पेक्षा जास्त दराने कमी आहे तेवढी रक्कम व बाब क्रं.(i) प्रमाणे येणारी रक्कम मिळून एकूण रक्कम राहील.( उदा.14 % कमी दर 10 % पर्यत करीता 1 % व ( 14 % - 10%) – 4% मिळून एकूण ( 1% + 4 %)- 5 %)
    b) परफॉर्मन्स सिक्युरिटी डिपॉझिट रक्कम आयुक्त सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे नांवे डी डी ( धनाकर्ष )च्या स्वरुपात देणेची आहे.
    c) सदरचा मुळ डी.डी. ( धनाकर्ष ) अग्निशमन विभाग मुख्यालय यांचे कार्यालयात सीलबंद लखोटयामध्ये जाहीर प्रकटन क्रंमाक / वर्ष कामाचे नाव व अ.क्रं.नमुद करुन निवीदा भरलेच्या तारखेनंतर पाच दिवसांत देणेचा आहे.
    d) सदर मुळ डी.डी. ( धनाकर्ष ) उक्तप्रमाणे विहीत मुदतीत प्राप्त झाला नाही तसेच डी.डी. ( धनाकर्ष ) मधील नमुद रक्कम मुद्दा क्रं.( a) मध्ये नमुद केलेनुसार नसेल तर सदर निवीदा धारकांची निवीदा पूढील मंजूरीसाठी ग्राहय धरणेत येणार नाही व त्यास अपात्र ठरविणेत येईल.
    e) सदर डी.डी. ( धनाकर्ष ) ची मुदत निवीदा भरणे तारखेपासून 3 महिन्यापर्यत राहील सदर डी.डी.वर बॅकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.
    f) पहिला लिफाफा उघडलेनंतर जर निवीदाधारक अपात्र ठरला व त्यामुळे त्याचा दुसरा लिफाफा उघडणेत येणार नसलेने त्याचा डी.डी. ( धनाकर्ष ) 7 दिवसामध्ये देणेत येईल.तसेच दुसरा लिफाफा उघडलेनंतर ज्यांच्या नावे काम मंजुर होईल त्याचा व दुसरा क्रमांकाच्या कमी दराच्या निवीदाधारकांचा डी.डी. ( धनाकर्ष ) मंजुर मक्तेदारास कार्यारंभ आदेश दिले तारखेनंतर 3 दिवसांमध्ये देणेत येईल.
    g) निवीदाधारकांची सदर निवीदेच्या अनुषंगाने जमा केलेली कागदपत्रे / डी.डी. ( धनाकर्ष ) खोटी असलेचे आढळून आलेस सदर निवीदाधारकांची बयाणा रक्कम (EMD) जप्त करुन घेणेत येईल व त्यांची नोंदणी 1 वर्षासाठी निलंबित करण्यात येईल.या व्यक्तीरिक्त कायद्यानुसार इतर कायदेशीर कारवाई करणेत येईल.
    h) मंजुर मक्तेदारास डी.डी. ( धनाकर्ष )बाबत पूर्ण शहानिशा डी.डी. ( धनाकर्ष )(Clearence व इतर बाबी ) झालेनंतरच कार्यारंभ आदेश देणेत येईल.
    i) काम समाधानकारकपणे पूर्ण झाल्यावर निवीदेतील तरतुदीप्रमाणे सदरचा डी.डी. ( धनाकर्ष )रक्कम मंजुर निवीदाधारकास तीन महिन्याच्या आत देणेत येईल.
    j) सदर अटी व शर्तीमध्ये सुधारणा करणे अटी शर्ती वाढविणे/कमी करणेचा अधिकार मा.आयुक्तांना राहील.

**मक्तेदाराची सही व शिक्का**